बाजार हस्तक्षेप योजनेंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या तुरीची भरडाई करुन तुरडाळ शालेय शिक्षण विभागास पुरवठा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक: सपस-२०१७/प्र.क्र.१९८/२४- स
मंत्रालय, विस्तार, मुंबई-३२
दिनांक:- ०८ मे, २०१८.

<u>संदर्भ</u> :- १. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग क्रमांक:- सपस-२०१७/ प्र.क्र.७७/२४-स, दिनांक २७.०४.२०१७, १६.०५.२०१७ व २६.०५.२०१७.
२. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग क्रमांक:- सपस-२०१७/ प्र.क्र.१९८/२४-स, दिनांक २३.१०.२०१७

शासन निर्णय-

उपरोक्त संदर्भाधीन क्र. २ येथील शासन निर्णयानुसार शासन निर्णयानुसार शाळेतील मुला-मुलींना शालेय पोषण आहाराकरिता, शालेय शिक्षण विभागास २०१७-१८ वर्षाकरिता आवश्यक असलेल्या तुरडाळीचा पुरवठा महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित, मुंबई यांच्यामार्फत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

२. या शासन निर्णयाच्या मुदा क्र. (५) मध्ये नमुद, तुरडाळीचा १ कि.ग्रॅम पॅकींगसाठी रु.८०/- व ५० कि.ग्रॅम पॅकींगसाठी रु.७५ या प्रति कि.ग्रॅम दराने पुरवठा करण्याची तरतुद केली आहे. यातील तुर डाळीच्या पुरवठयाच्या दरात, बाजारातील तुर डाळीचे दर लक्षात घेऊन, मंत्रालयीन विभागांकडून सुधारणा करण्याची विनंती प्राप्त झाल्याने, सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या विनंतीच्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

३. या शासन निर्णयाच्या मुदा क्र. (५) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा **दि.२३.१०.२०१७ रोजीपासुन पुर्वलक्षीप्रभावाने** करण्यात येत आहे.

"या तुरडाळीचा पुरवठा रु.५५/- प्रती किलो या दराने करण्यात यावा. “

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०९१११६५४५७०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Valvi Kalu Gonya

Digitally signed by Valvi Kalu Gonya
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Op,Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=714701fc3db9c38a46f4cd82e1e450b51a9e92eede8c323934f82edb538d3b20, cn=Valvi Kalu Gonya
Date: 2018.05.09 11:24:21 +05'30'

(का.गो.वळवी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबारहिल, मुंबई

२. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री (सहकार, पणन व वस्त्रोद्योग) मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (शालेय शिक्षण) मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री (पणन) यांचे मंत्रालय, मुंबई
६. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.अ.मु.स. (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८. मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण) मंत्रालय, मुंबई
९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या. मुंबई,
१०.पणन संचालक, महाराष्ट राज्य, पुणे.